ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणेबाबत.(श्री.अविनाश नामदेव वाकडे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत विळद तालुका अहिल्यानगर )

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र. 9228595
दिनांक - 05 / 04/२०२५

संदर्भ :- १ .या कार्यालयाकडील सेवा निलंबन आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३७७/२०२३,दि. १६/१०/२०२३
२. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/७५२/२०२३ दि. १२/१०/२०२३
३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (१)
४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (५)
५. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. निप्रआ-१११२/प्र.क्र.८६/११-अ, दिनांक- १४/१०/२०११
६. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र. विप्रआ-१११२/प्र.क्र.८२/११-अ, दि.२० एप्रिल २०१३
७. महाराष्ट्र शासन प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. निप्रआ११८/प्र.क्र.११/११अ, दिनांक- ०९/०७/२०१९

संदर्भ क्रमांक ०१ चे आदेशान्वये श्री.अविनाश नामदेव वाकडे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत विळद तालुका अहिल्यानगर यांना कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कर्तव्यात कसुर करण्याचे गैरवर्तन केल्याने जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले आहे.

संदर्भ क्रमांक ०२ चे ज्ञापनान्वये श्री.अविनाश नामदेव वाकडे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत विळद तालुका अहिल्यानगर यांचे विरुध्द गैरवर्तनाबाबत एकूण ०७ दोषारोप बजावण्यात आलेले होते.

संदर्भ क्रमांक ०७ चे शासन निर्णयानुसार श्री.अविनाश नामदेव वाकडे सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा सेवा निलंबन कालावधी तीन महिन्यापेक्षा अधिक झालेला असल्याने व श्री.वाकडे यांनी त्यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप मान्य केलेले असल्याने त्यांची विभागीय चौकशी सुरु न करता त्यांचे गैरवर्तनाबाबत जिल्हा परिषद स्तरावर शिक्षा अंतिम करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यांचे सेवानिंलबनाचा आढावा घेण्यात आलेला असुन या निलंबन प्रकरणी श्री.अविनाश नामदेव वाकडे यांचे सेवानिलंबन या पुढे चालू न ठेवण्याचा व जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

सबब महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाव्दारे श्री.अविनाश नामदेव वाकडे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत विळद तालुका अहिल्यानगर पंचायत समिती अहिल्यानगर यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती ----राहुरी----- येथे पुन:स्थापित करीत आहे.

श्री.अविनाश नामदेव वाकडे सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर यांचा या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

या आदेशाची नोंद श्री.अविनाश नामदेव वाकडे सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी समिती अहिल्यानगर यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 202405050E0083 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 08-05-2025 13:46:51

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री.अविनाश नामदेव वाकडे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत विळद तालुका अहिल्यानगर, मुख्यालय पंचायत समिती राहुरी

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी
२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अहवाल सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी
२/- श्री.अविनाश नामदेव वाकडे सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी हे झालेनंतर हजर अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी